**ठळक बातम्या**

- आठव्या वेतन आयोगाची स्थापना करायला केंद्र सरकारची मंजुरी
- मुदत संपल्यानं सहा जिल्हा परिषदा आणि ४४ पंचायती समित्यांवर प्रशासक नेमण्याचा राज्य सरकारचा निर्णय
- धरणांमधल्या पाण्याचा सिंचनासाठी पूर्ण क्षमतेनं वापर करण्याचे जलसंपदा मंत्र्यांचे निर्देश

  **आणि**

- अभिनेता सैफ अली खानची प्रकृती स्थिर, आरोपीच्या शोधासाठी पोलिसांकडून १० पथकांची स्थापना

**<><><><><>**

केंद्र सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांसाठी आठव्या वेतन आयोगाची स्थापना करायचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. विद्यमान सातव्या वेतन आयोगाचा कालावधी पुढच्या वर्षी संपणार आहे. तोपर्यंत या वेतन आयोगाच्या शिफारसी प्राप्त होतील, अशी माहिती माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. आयोगाचे अध्यक्ष आणि २ सदस्यांची नेमणूक लवकरच होईल, असंही ते म्हणाले.

**होल्ड -- बाइट -- अश्विनी वैष्णव**

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघानं केंद्र सरकारच्या या निर्णयाचं स्वागत केलं आहे. केंद्र सरकार ज्या दिवसापासून या वेतन आयोगाची

अंमलबजावणी करेल त्यादिवसापासून राज्यातही याची अंमलबजावणी करण्याची मागणी महासंघानं केली आहे.

दरम्यान, श्रीहरीकोटा इथं सतीश धवन अंतराळ केंद्रात तिसरं लाँच पॅड उभारायलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. चंद्रावर मानव पाठवण्याच्या इस्त्रोच्या आगामी मोहिमांसाठी याचा वापर होईल.

**<><><><><>**

मुदत संपल्यानं राज्यातल्या सहा जिल्हा परिषदा आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या एकूण ४४ पंचायती समित्यांवर प्रशासक नेमण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. या जिल्हा परिषदांमध्ये नागपूर, अकोला, वाशिम, धुळे, नंदुरबार आणि पालघर यांचा समावेश आहे. या सहा जिल्हा परिषदांच्या अंतर्गत येणाऱ्या ४४ पंचायत समित्यांची मुदतही संपल्याने प्रशासक नेमण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी निवडणूक होईपर्यंत प्रशासक म्हणून काम पाहतील.

**<><><><><>**

राज्य सरकारनं संजय शिरसाठ यांना सिडकोच्या अध्यक्षपदावरुन दूर केलं आहे. त्यांची मंत्रीपदावर नियुक्ती झाल्यानं त्यांच्याकडचा हा पदभार काढून घेतल्याचं सरकारनं शासन निर्णयात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत केली. राष्ट्रीय स्टार्टअप दिवसानिमित्तानं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

सिडबी - स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडियाकडून स्टार्ट अपसाठी २०० कोटी रुपये तर प्रत्येक प्रादेशिक विभागाला ३० कोटी रुपयांची तरतूद करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. राज्यातील स्टार्टअप जगात पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रयत्नशील आहेत, असं कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले.

कार्यक्रमाला देशभरातील तंत्रज्ञान, कृषी, सेवा क्षेत्र, औषधनिर्माण तसेच पर्यटन अशा विविध क्षेत्रांतील १ हजार स्टार्टअप या कार्यक्रमात उपस्थित होते.

**<><><><><>**

धरणातल्या पाण्याचा सिंचनासाठी पूर्ण क्षमतेने वापर करावा अशा सूचना जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिल्या आहेत. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या बैठकीत मंत्रालयात ते बोलत होते. सिंचन क्षेत्र वाढून शेतकऱ्यांना सिंचनाच्या पाण्यासाठी अडथळा येऊ नये असे नियोजन जलसंपदा विभागाने करणे आवश्यक आहे. मोठ्या प्रकल्पांच्या सुधारित मान्यतेचे प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणावेत अशा सूचना त्यांनी दिल्या. गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाला चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासोबतच विविध प्रस्तावांना नियामक मंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळातल्या सर्वच पदांचा आकृतीबंध त्वरित तयार करुन रिक्त पदांचा अनुशेष भरण्याची कार्यवाही करावी, अशी सूचनाही महाजन यांनी केली.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या गंगापूर, कडावा कालव्यातली गळती कमी करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या आहेत. शेतीसाठी पाण्याचे आवर्तन देतांना जवळपास ६० टक्के पाणी गळतीचे प्रमाण दिसून येत

असून गळतीचं प्रमाण ६० टक्क्यांवरून २० टक्क्यांवर आणण्यासाठी जिल्हा प्रशासनानं आणि जलसंपदा विभागानं काटेकोर नियोजन करावं असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

यांत्रिकीकरणामुळे सध्या शेत वहीवाटीत मोठ्या वाहनांचा वापर होतो, त्यामुळे वाहन प्रकारानुसार शेत रस्ता बनवण्याबाबत तहसीलदारांना निर्णय घेता यावा यासाठी मार्गदर्शक सूचना जारी करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. शेत वहिवाट रस्त्याची  तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. त्यानंतर,  त्यावर अपील थेट उच्च न्यायालयात केलं जातं. त्याआधी मधली पायरी म्हणून अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करता आलं पाहिजे, त्यानुसार नियमात सुधारणा कराव्यात, असं त्यांनी सांगितलं.

गृहनिर्माण संस्था आणि आणि विकासक यांच्यातल्या वादात समझोता कराराचा दस्तऐवज सात दिवसांत तक्रारीसोबत सहजिल्हा निबंधकांकडे आला नाही, तर छायांकित प्रतीच्या आधारे दस्ताची मुद्रांक शुल्क निश्चिती, आणि आवश्यकतेनुसार वसुलीची कार्यवाही सुरू केली जाईल, असा निर्णय बावनकुळे यांनी एका प्रकरणात घेतला.

<><><><><>

अभिनेता सैफ अली खान याची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी दिली आहे. मुंबईतल्या लीलावती रुग्णालयात त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली असून अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. पहाटे

मुंबईतल्या घरी अज्ञात इसमानं त्याच्यावर चाकू हल्ला केला होता. त्यात त्याला ६ ठिकाणी जखमा झाल्या होत्या, त्यातल्या २ जखमा खोल आहेत. त्यानंतर लीलावती रुग्णालयात त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. यात मणक्यातून चाकूचा तुकडा डॉक्टरांनी बाहेर काढला.

या प्रकरणी एका व्यक्तिविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी १० पथकांची नियुक्ती करण्यात केल्याची माहिती पोलीस उपायुक्त दीक्षित गेडाम यांनी दिली.

दरम्यान, याप्रकरणी विरोधकांनी राज्यातल्या कायदा सुव्यवस्थेवरुन सरकारवर टीका केली आहे. केवळ आश्वासन देण्याऐवजी कठोर कारवाई करण्याची हिम्मत मुख्यमंत्र्यांनी दाखवावी, असं आव्हान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिलं आहे.

देशातल्या सर्व महानगरांमध्ये मुंबई हे सर्वात सुरक्षित आहे. केवळ एका घटनेवरुन मुंबई असुरक्षित आहे असं म्हणणं चुकीचं असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. अशा आरोपांमुळे मुंबईची प्रतिमा खराब होते. मुंबईला आणखी सुरक्षित करण्यासाठी सरकार काम करत असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

जागतिक हवामान बदल रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचं राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी आज चंद्रपूर इथं सांगितलं. हवामान बदल २०२५ या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांना एकत्र आणण्यासाठी एका ॲप ची निर्मिती करणार असल्याचं परिषदेचे संयोजक सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं डिफेन्स अकाऊंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेवरचे निर्बंध आजपासून हटवले आहेत. गेल्यावर्षी मार्च महिन्यात बँकेवर निर्बंध लादले होते. मात्र बँकेच्या वित्तीय परिस्थितीची तपासणी केल्यानंतर निर्बंध हटवण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतला आहे.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ तालुक्यातल्या सारंगवाडी डोंगरावर यंदाही यात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. यात्रेवेळी तयार करण्यात आलेल्या विशेष प्रसादाविषयी ऐकूया आमच्या वार्ताहराकडून…

**होल्ड-- व्हीसी…**

*(वीरशैव समाज बांधवांचे आराध्य दैवत असलेल्या संतश्रेष्ठ सारंग स्वामी महाराज यांचे समाधी स्थळ असलेल्या हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ तालुक्यातील सारंगवाडी येथील डोंगरावर ऐतिहासिक यात्रेला भाविकांनी मोठी गर्दी केली. परिसरातील शेतांमध्ये पिकलेल्या 40 प्रकारच्या पालेभाज्या, फळभाज्या व कंदमुळे यांचा समावेश असलेल्या 140 क्विंटल भाजीच्या महाप्रसादाचा लाभ उपस्थित भाविकांनी घेतला. दरवर्षी मकर संक्रांतीच्या तिसऱ्या दिवशी हा महाप्रसाद यात्रेनिमित्त वाटप करण्यात येतो. आकाशवाणी बातम्यांसाठी रमेश कदम हिंगोली.)*

<><><><><>

रायगड जिल्ह्यातल्या लोणेर इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात १७ वी महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठीय आविष्कार संशोधन स्पर्धा झाली. १२ ते १५ जानेवारी या कालावधीत झालेल्या स्पर्धेत मुंबई विद्यापीठानं १३ सुवर्ण, ७ रौप्य आणि ३ कांस्य पदके मिळवत सलग सहाव्या वर्षी विजेतेपद पटकावलं. स्पर्धेत राज्यातली २४ विद्यापीठं सहभागी झाली होती. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्यांचे उच्च आणि तंत्रशिक्षण  मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अभिनंदन केलं.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. सर्वात कमी किमान तापमान महाबळेश्वर इथं १४ पूर्णांक ८ दशांश  सेल्सियस इतकं नोंदवलं गेलं.  येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.